सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/ २६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

**जा.क्र.बार्टी पुणे/IBPS वि./अनि. /निवासी/ निकाल घोषणापत्र/२०२३-२४/६७१४** **दि.१८/१२/२०२४**

# घोषणापत्रक

## BARTI-IBPS-CET- २०२४-२५ (दि.०८ डिसेंबर, २०२४)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जाती मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी- मांग ,मांग- म्हशी, मदारी,गारुडी, राधे मांग, मांग- गारोडी, मांग- गारूडी प्रवर्गातील युवक - युवतीसाठी बँक, रेल्वे, एल. आय. सी. इत्यादी व तत्सम पदाच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण वर्ग (निवासी स्वरूपाचे) लातूर, अकोला या जिल्हाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक-युवतीसाठी बँक, रेल्वे, एल. आय. सी. इत्यादी व तत्सम पदाच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण वर्ग (अनिवासी स्वरूपाचे) कोल्हापूर या जिल्हाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी राबविण्यात येत आहे.

दि.०८ डिसेंबर, २०२४ रोजी, बार्टी मार्फत आयोजित करण्यात आलेल्या BARTI-IBPS-CET- २०२४- २०२५ चाळणी परीक्षा **लातूर, अकोला** या जिल्ह्यांत निवासी तसेच **कोल्हापूर** या जिल्ह्यांत अनिवासी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याकरीता चाळणी परीक्षा घेण्यात आली होती.

सदर घोषणापत्रकाव्दारे BARTI- IBPS-CET-२०२४- २०२५ (कोल्हापूर, अकोला, लातूर) चाळणी परीक्षेचा निकाल बार्टीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षणास निवड झालेल्या ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी UPSC/MPSC/ Police and Military Bharti व fellowship या योजनांचा लाभ घेतलेला आहे. अशा विद्यार्थ्यांची निवड रद्द करण्यात येईल. अशा प्रशिक्षणार्थ्यांला दुबार लाभार्थी समजण्यात येईल. या प्रशिक्षणार्थ्यांचा प्रवेश रद्द करून प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांची गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. याची सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी नोंद घ्यावी, तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यात दुबार लाभार्थी असल्याचे आढळून आल्यास निवड रद्द करून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**स्वाक्षरी**
उमेश सोनवणे
**विभाग प्रमुख (IBPS)**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे**

BARTI